# Study Circle Career Development Institute

# AMC
# Paper 2000

**A**

**Time : 1 Hrs.** **Marks : 200**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्याच विषयाचे प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आले आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

# AMC, MCGB, Examination Paper - 2000
## Screening Test

१) ...... या शहराची महानगरपालिका भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीपूर्वी स्थापन करण्यात आली.
१) नागपूर २) कोलकाता ३) बंगलोर ४) कानपूर

---

२) यादी–१ व यादी–२ मधून जोड्या लावा व दिलेल्या जोड्यातून तुमचे उत्तर लिहा.

| यादी–१ | यादी–२ |
|---|---|
| अ) एफ्. डब्ल्यू. टेलर | १) एलिमेन्ट्स ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन |
| ब) उर्विक | २) इंन्ट्रोडक्शन टू पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन |
| क) विलोबी | ३) ॲडमिनिस्ट्रेटिव्ह बिहेविअर |
| ड) व्हाईट | ४) प्रिन्सिपल ऑफ सायंटीफिक मॅनेजमेंट |

१) अ–३, ब–४, क–२, ड–१ २) ब–४, क–१, ड–३, अ–२
३) अ–४, ब–१, ड–२, क–३ ४) अ–२, ब–३, क–१, ड–४

---

३) प्रवेशोत्तर प्रशिक्षणाचा हेतू ...... आहे.
१) शालेय शिक्षणातील दोष दूर करणे २) पुढील जबाबदाऱ्यांसाठी तयारी करणे
३) वर्तमान कर्तव्याच्या गरजांसाठी ४) पुन:प्रशिक्षण म्हणून

---

४) विकसनशील देशातील कार्मिक प्रशासनाच्या सामान्य वैशिष्ट्यांपैकी ...... एक आहे.
१) विशेष आणि तांत्रिक सेवांना प्राधान्य २) हित संबंधांची समस्या
३) सेवेतील असुरक्षितता ४) मलिदा–पद्धती

---

५) ७४ व्या घटनादुरुस्ती–१९९२ ने ...... परिशिष्टाची तरतूद केली आहे.
१) दहाव्या २) अकराव्या ३) बाराव्या ४) तेराव्या

---

६) यादी–१ आणि यादी–२ मधून जोड्या लावून खाली दिलेल्या पर्यायातून अचूक पर्याय निवडा.

| यादी–१ | यादी–२ |
|---|---|
| अ) बॉम्बे म्युनिसिपल कॉर्पोरेशन | १) रॉयल चार्टर ऑफ – १६८७ |
| ब) मद्रास म्युनिसिपल कॉर्पोरेशन | २) स्पेशिअल लेजिस्लेशन ऑफ – १८६३ |
| क) कोलकाता म्युनिसिपल कॉर्पोरेशन | ३) रॉयल चार्टर ऑफ – १७२६ |
| ड) दिल्ली म्युनिसिपल कॉर्पोरेशन | ४) ॲक्ट ऑफ – १९५७ |

१) अ–३, ब–१, क–२, ड–४ २) अ–१, ब–२, क–४, ड–३
३) अ–२, ब–३, क–१, ड–४ ४) अ–४, ब–२, क–३, ड–१

---

७) ...... हे शास्त्रीय व्यवस्थापनाचे जनक ओळखले जातात.

१) ओडवे टीड २) अपल्बी पॉल ३) फॉलेट एम. पी. ४) एफ्. डब्ल्यू. टेलर

---

८) अ यादीची ब यादीशी बरोबर जोडी जुळवा, खाली दिलेले पर्याय वापरून उत्तर तयार करा.

| **यादी–अ** | **यादी–ब** |
|---|---|
| अ) संघटनेचा उगम | १) खाते |
| ब) संघटनेचे तत्त्व | २) मानवी |
| क) संघटनेचा प्रकार | ३) अधिकारपद परंपरा |
| ड) संघटनेचा दृष्टिकोन | ४) काही उद्दिष्टांची पूर्तता |

१) अ–३, ब–४, क–१, ड–२ २) अ–४, ब–३, क–१, ड–२

३) अ–१, ब–४, क–२, ड–३ ४) अ–१, ब–२, क–३, ड–४

---

९) ''बेस्ट'' ही ...... आहे.

१) मुंबई महानगरपालिकेतील एक विभाग २) शासकीय उपक्रम

३) विशेष परिनियमाने प्रस्थापिलेली संस्था ४) मुंबई महापालिकेचा परिनियम विभाग

---

१०) निष्पादन अंदाजपत्रकाचा उद्देश–उत्पादनाच्या ...... स्वरूपाचे मूल्यांकन करणे होय.

१) केवळ गुणात्मक २) केवळ संख्यात्मक

३) गुणात्मक कमी व संख्यात्मक अधिक ४) गुणात्मक अधिक व संख्यात्मक कमी

---

११) प्रशासनात संघर्ष का निर्माण होतात ?

१) प्रशासनाच्या भूमिकेविषयीचे गैरसमज २) कार्य नियमांमधील अपुरेपणा

३) वरिष्ठ व कनिष्ठांमधील अधिकारांची जाणीव ४) प्रशासकाची व्यवस्थापनातील असक्षमता

---

१२) आधुनिक काळात ग्रामीण विकासाचे प्रमुख अंग आहे ......

१) प्रकल्प विकास २) प्रकल्प व्यवस्थापन

३) प्रकल्प विकास आणि व्यवस्थापन ४) धडक कार्ययोजना

---

१३) संगणकाला भाषा आहेत, खालीलपैकी असंबद्ध पद शोधून काढा.

१) कोबोल २) फोट्रॉन ३) डी–बेस ४) बेसिक

---

१४) अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाची सर्वाधिक योग्य पद्धती कोणती ते सांगा.

१) कार्य प्रशिक्षण २) कार्यातील बदल ३) परिषद ४) व्यष्टि अध्ययन

---

१५) प्रशासनामध्ये स्वच्छ, स्पष्ट व भक्कम धोरणाचे महत्त्व काय ?
१) निर्णय प्रक्रियेत अधिकार प्रदानाला प्रोत्साहन
२) व्यवस्थापकामध्ये नेतृत्वाची वाढ
३) व्यवस्थापकामध्ये कार्यप्रेरणा निर्माण करण्याचे प्रयत्न
४) मानसिक समाधानामध्ये वाढ

---

१६) नियंत्रण तंत्राच्या व्यवहारात काही वेळेस उद्दिष्टांचे दिशा संकेत वेगळे असतात, पण कार्य–निष्पादन आणि परिणाम संकलनाची पद्धती वेगळी असते. आणि त्याचा परिणाम एकूण वर्तनावर जसा होतो त्यास म्हणतात......
१) लक्ष्यच्युती २) कार्यभूमिका–संघर्ष ३) घातक–परिणाम ४) शून्य–परिणाम

---

१७) आधुनिक प्रशासनाचे नेतृत्व असे असावे काय ?
१) लोकशाही नेतृत्व २) नेतृत्वाने दिलेल्या आज्ञांचे पालन
३) हुकूमशाही नेतृत्व ४) औपचारिक संघटनात्मक नेतृत्व

---

१८) संघटनेचे वर्गीकरण (अ) परस्पर हितकारी संघटना, (ब) व्यावसायिक संस्था, (क) सेवा संघटना आणि (ड) समहित संघटना. या चार मूलगामी प्रकारात केल्यास, त्याचे लक्ष्य ज्याकडे असते, ते आहे ......
१) कार्य २) तंत्रज्ञान ३) संस्कृती ४) व्यूहरचना

---

१९) योग्य उत्तर–समूह निवडा.
१) संगणक कार्यक्षमता वाढविण्यात मदत करतात.
२) संगणकामुळे बेकारी निर्माण होते.
३) संगणकामुळे तात्पुरती बेकारी निर्माण होते, पण कालांतराने पर्यायी कामांची निर्मिती होते.
४) संगणकांमुळे मानवीय चुकांची शक्यता नाहीशी होते.
१) (१+२+३) २) (१+३+४) ३) (१+२+४) ४) (२+३+४)

---

२०) दारिद्र्य म्हणजे ......
१) सामाजिक मागासलेपणा २) अभावग्रस्तता
३) खालावलेले जीवनमान ४) यापैकी कोणतेही नाही

---

२१) दुहेरी संदेशवहन म्हणजे ...... संदेशवहन होय.
१) विभिन्न विभागप्रमुखांमधील २) कामगारांच्या विभिन्न समूहांमधील
३) व्यवस्थापन व सामान्य जनतेमधील ४) व्यवस्थापन व कामगारांमधील

---

२२) आधुनिक उद्योगात संचालनाचे सर्वाधिक लोकप्रिय तंत्र म्हणजे ......
१) हुकूमशाही तंत्र २) सल्लामसलतीचे तंत्र
३) मुक्त संचालनाचे तंत्र ४) या सर्व तंत्राचा संयोग

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

२३) केन्द्रीकरण म्हणजे ......
१) क्रियात्मक कार्याचे हस्तांतरण न करणे
२) प्रबंधात्मक कार्याचे हस्तांतरण न करणे
३) क्रियात्मक व प्रबंधात्मक अशा दोन्ही कार्याचे हस्तांतरण न करणे
४) संपूर्ण हुकूमशाही

---

२४) खरी निर्णय प्रक्रिया निर्देशित करा.
१) व्यवस्थापकाने निर्णय घेणे व सहाय्यकांनी तो अमलात आणणे
२) व्यवस्थापकाने निर्णय घेणे व स्वत: अमलात आणणे
३) व्यवस्थापकाने सहाय्यकांच्या सल्लामसलतीने निर्णय घेणे
४) सहाय्यकांनी निर्णय घेणे व व्यवस्थापनाने तो अमलात आणणे

---

२५) संगणक प्रशासनात कशासाठी उपयुक्त आहे ?
१) व्यवस्थापकीय कार्यपद्धत ठरविण्यासाठी
२) व्यवस्थापनासाठी माहिती उपलब्धतेची पद्धत
३) संघटनेचे स्वरूप ठरविण्याचे साधन
४) व्यवस्थापनाचे आधुनिक तंत्र

---

२६) संदेश वहनामध्ये लहान गट महत्त्वाची भूमिका का पार पाडतात ?
१) त्यांचे सामाजिक संबंध चांगले असतात
२) मतांची व विचारांची देवाणघेवाण कार्यक्षमपणे करता येते
३) समोरा समोर संभाषण शक्य होते
४) कार्यक्षम संदेश वहनाची शक्यता

---

२७) व्यवस्थापकाला संगणकाविषयी काय माहीत असावे ?
१) संगणकाचा सुप्त व कार्यात्मक परिणाम
२) संगणकाची सुप्त व कार्यात्मक कार्यक्षमता
३) संगणकाचे हार्डवेअर व सॉफ्टवेअर
४) संगणकावरील उपक्रमांची कार्यपद्धत

---

२८) ''क्ष'' सिद्धांतावर टीका आणि ''य'' सिद्धांताचे प्रतिपादन कोणी केले ?
१) आलिव्हर शेल्डन
२) मॅकग्रेगर
३) पीटर ड्रकर
४) चेस्टर बर्नार्ड

---

२९) निर्णय प्रक्रियेतील कोणता टप्पा चूक आहे ?
१) समस्येची व्याख्या करणे
२) योग्य माहिती संकलित करणे
३) पर्यायांचा विकास करणे
४) कोणत्याही एका पर्यायाची निवड करणे

---



Study CIRCLE

३०) सार्वजनिक व्यवस्थापनामध्ये अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाची गरज काय ?
१) उत्पादन क्षमतेत वाढ व सामाजिक खर्चात बचत
२) कार्यक्षम निर्णय शक्तीतील वाढ
३) कर्मचाऱ्यांतील मनोबल वाढविण्याचे प्रयत्न
४) कर्मचाऱ्यातील प्रवृत्तीत बदल करण्याची क्षमता

---

३१) सुज्ञ व्यवस्थापन पुढीलपैकी कोणत्या प्रकारच्या कामगार संघटनेला प्रोत्साहन देते ?
१) एकच संघटना
२) एकापेक्षा अधिक संघटना
३) बाहेरील संघटना
४) स्थानिक नेतृत्व असलेली एकच अंतर्गत संघटना

---

३२) तुमच्या कार्यालयातील कनिष्ठ कर्मचाऱ्याने त्याच्या नजीकच्या वरिष्ठा विषयी एका संघटनेच्या संदर्भात तक्रार केली आहे. अशा वेळी तुम्ही प्रथम काय कराल ?
१) तक्रारीकडे दुर्लक्ष करून दफ्तरी दाखल कराल
२) घटनेसंबंधी अधिक तपशील घ्याल
३) संबंधित अधिकाऱ्याला मेमो द्याल
४) तक्रार करणाऱ्या कर्मचाऱ्याला त्याची तक्रार वरिष्ठांमार्फत सादर करण्यास सांगाल

---

३३) जर कर्मचाऱ्यांना कार्यप्रवृत्त करण्यासाठी आधुनिक विचारप्रणालीचा अवलंब करावयाचा असेल, तर पुढीलपैकी कोणता मार्ग हा चुकीचा आहे ?
१) कर्मचाऱ्यांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करा
२) चांगल्या कामाची प्रशंसा करा
३) कार्यक्षम कर्मचाऱ्यांवर जबाबदारी टाका
४) काम झाले नाही तर शिक्षा करा व काढून टाकण्याची धमकी द्या

---

३४) खालील विधानापैकी कोणते विधान कर्मचाऱ्यांच्या शास्त्रीय निवडीसाठी घेतल्या जाणाऱ्या योग्यता चाचणीचे संदर्भात आहे.
१) ही चाचणी उमेदवाराचे नवीन काम शिकण्याचे बाबतीत सुप्त गुणांचे मापन करते
२) ही चाचणी वेगवेगळ्या कामांचे बाबतीत वापरता येते
३) ही चाचणी व्यक्तींचे धोरण मोजत नाही
४) ही चाचणी व्यक्तींच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे निरनिराळे पैलू स्पष्ट करते

---

३५) संघटनेमध्ये बदल्या करण्याचे मुख्य कारण म्हणजे –
१) कर्मचाऱ्यांची आवश्यकता आणि उपलब्धता यामध्ये योग्य मेळ घालणे
२) अधिकार गाजविणे
३) कर्मचाऱ्यांना शासन करणे
४) कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य वाढवणे

---



Study CIRCLE

३६) खालीलपैकी कोणत्या व्यवस्थापकीय पद्धतीचा अवलंब केला असता उत्पादकता वाढेल ?
१) हाताखालील लोकांची मदत नाकारणे
२) व्यवस्थापनाशी पूर्णत: तादात्म्य होणे
३) कर्मचाऱ्यांशी पूर्णत: तादात्म्य होणे
४) कर्मचारी सल्ला मसलत आणि कर्मचारी व व्यवस्थापन या दोघांशी तादात्म्य होणे

---

३७) सर्वोत्तम प्रशिक्षणाच्या सोयी असून सुद्धा, काहीतरी मोबदला मिळाल्याशिवाय प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण कार्यक्रमांत रस घेणार नाहीत. कारण –
१) मनुष्य हा स्वभावत: आळशी आहे
२) माणूस सुखलोलुप आहे
३) नेहमीपेक्षा निराळे माणसाला आवडत नाही
४) मानवी वर्तणूक ही ध्येयनिष्ठ आहे

---

३८) कार्यमान मूल्यमापनांचा फायदा व्यवस्थापनाला कर्मचाऱ्यांच्या बढतीसाठी होतो. कारण –
१) मागील मूल्यमापनांचे परीक्षण, त्याचे प्रमाणे इतर पार्श्वभूमीची माहिती व्यवस्थापनाला बढतीसाठी मदत करतात
२) मूल्यमापन कामाचे वर्णन करते
३) ते तर्कशुद्ध आहे
४) नाही, कार्यमान मूल्यमापन व बढती यांच्या मध्ये काहीही संबंध नाही

---

३९) कुशलता कोषामध्ये कर्मचाऱ्यांच्या कुशलतेचा अंतर्भाव करताना आपण खालील घटकांचा विचार करावा.
१) फक्त शैक्षणिक पात्रता
२) फक्त भावनिक गुण
३) फक्त शारीरिक गुण
४) वरीलपैकी सर्व

---

४०) सर्वसाधारण कामगार व व्यवस्थापक यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या ध्येयात कोणता फरक दिसतो ?
१) फरक नाही
२) फरक आहे. कामगारांना ढोबळ मानाने ज्ञान व कारखान्याच्या वातावरणाची जाण हे ध्येय आहे, तर व्यवस्थापकांना वैयक्तिक दृष्टिकोन, सूक्ष्म दृष्टी व काही कसबांचे ज्ञान हे ध्येय असते.
३) फार थोडा फरक आहे
४) फरक वरवरचा आहे

---

४१) निष्पादन मूल्यांकन पदाधिकारी व्यवस्थापनाचे एक स्थायी शस्त्र आहे. कारण –
अ) यामुळे प्राप्त माहिती चयन, प्रशिक्षण, बढती इत्यादींचा निर्णय घेण्यास अत्यंत उपयोगी राहते.
ब) यामुळे प्राप्त माहिती कामाचे महत्त्व निश्चित करण्यासाठी अत्यंत उपयोगी पडते.
क) यामुळे कर्मचाऱ्यांना आपल्या त्रुटी लक्षात येतात आणि त्यांना स्वत:चे मूल्यमापन करण्यास मदत मिळते.
ड) यामुळे नवनियुक्तांना ठरावीक लक्ष्य कसे प्राप्त करता येईल यासंबंधी बौद्धिक निष्पादनाचे आधारभूत ज्ञान व कौशल्य प्राप्त होत असते.
१) (ब) फक्त बरोबर आहे
२) (ब) आणि (क) दोन्ही बरोबर आहेत
३) (अ) आणि (क) दोन्ही बरोबर आहेत
४) (क) आणि (ड) दोन्ही बरोबर आहेत

---



study CIRCLE

४२) ''मोटिव्हेशन–हायजिन्'' थेअरीचा प्रणेता कोण ?

१) रेन्सिस लिकर्ट २) फ्रेडरिक् हर्झबर्ग ३) ऑल्फ्रेड ॲडलर ४) मॅक्लेलँड

---

४३) कर्मचाऱ्यासाठी ''करिअर प्लॅन'' तयार केल्यामुळे खालील बाबीसंबंधी त्याचा उपयोग होतो.

१) कर्मचाऱ्यांना संस्थेतच राहण्यासाठी प्रवृत्त करणे २) कर्मचाऱ्यांमध्ये कामासंबंधी उत्साह निर्माण करणे

३) कर्मचाऱ्यांना स्वयंशिस्तीसाठी प्रवृत्त करणे ४) वरील सर्व बरोबर

---

४४) कर्मचाऱ्यांच्या मनोधैर्याचे बाबतीत पुढीलपैकी कोणते विधान खरे आहे ?

१) व्यवस्थापनाने कामगारांचे मनोधैर्याची काळजी करण्याचे कारण नाही

२) मनोधैर्याचा संबंध कामगारांच्या शारीरिक परिस्थितीशी असतो

३) मनोधैर्य ही केवळ व्यक्तिगत संकल्पना आहे

४) चांगल्या प्रेरणेमुळे मनोधैर्य उंचावते

---

४५) गरजांच्या क्रमवारी सिद्धांताच्या संकल्पनेचा जनक (प्रणेता) कोण ?

१) सिगमंड फ्रॉईड २) ॲब्राम मॅसलो ३) फ्रेडरिक हर्झबर्ग ४) फ्रेडरिक विन्स्लो टेलर

---

४६) कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षणासाठी केलेला खर्च म्हणजे –

१) अनावश्यक खर्च होय २) आवश्यक खर्च होय

३) वायफळ खर्च होय ४) कर्मचाऱ्यांवर केलेली गुंतवणूक होय

---

४७) कर्मचाऱ्यांची बदली म्हणजे –

१) एका कामावरून दुसऱ्या कामाकडे जाणे

२) एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर

३) कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीसह स्थलांतर

४) कर्मचाऱ्यांचे एका कामाकडून दुसऱ्या कामाकडे कामाचे स्वरूप, जबाबदाऱ्या व कौशल्य यांमध्ये कोणतेही मोठे बदल होता होणारे स्थलांतर

---

४८) चुकीच्या वागणुकीचा अपराध सिद्ध झाल्यास कर्मचाऱ्याला मोठी शिक्षा होऊ शकते. खालीलपैकी कोणती शिक्षा ही ''मोठी'' ठरत नाही ?

१) नोकरीत खंड देणे २) नोकरीवरून कमी करणे

३) नोकरीतून काढून टाकणे ४) इशारा देणे

---

४९) प्राथमिक प्रशिक्षण कार्यक्रम हा पुढीलपैकी कोणत्या कर्मचाऱ्यासाठी आवश्यक असतो ?

१) कायम झालेले कर्मचारी २) नव्याने नेमणूक झालेले कर्मचारी

३) वरिष्ठ कर्मचारी ४) कामगार

---



Study CIRCLE

५०) राष्ट्रीय पातळीवरील मनुष्य नियोजन करणे म्हणजे –
१) सरकारी उपक्रमांमधील मनुष्यबळाचा अंदाज करणे
२) संघटित कर्मचाऱ्यांचे नियोजन करणे
३) शेती विषयक कामगारांचे नियोजन करणे
४) लोकसंख्या, शिक्षण व रोजगार संधी यांचा राष्ट्रीय पातळीवर विचार करणे

---

५१) खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?
१) रोख रक्कम तपासण्याची आवश्यकता नसते
२) रोख रक्कम तपासण्यापूर्वी पूर्वसूचना दिली पाहिजे
३) पूर्वसूचना न देता सर्व रोकड रकमा तपासल्या जाव्यात
४) रोख रक्कम अचानक व परत तपासू नये

---

५२) प्रमंडळाचे अधिभांडवलीकरण पुढील कारणांमुळे होते.
अ) संभाव्य उत्पन्नाचा अधिक अंदाज
ब) अपेक्षित निधीचा चुकीचा अंदाज
क) अतिरिक्त निधीचा कार्यक्षम विनियोग होत नाही
ड) प्रतिभूतीची बाजार–किंमत निर्गमित किमतीपेक्षा कमी होते.
१) केवळ अ बरोबर आहे
२) अ आणि ब बरोबर आहे
३) अ, ब आणि क बरोबर आहे
४) सर्व बरोबर आहेत

---

५३) पुढील कोणत्या सूत्राच्या सहाय्याने समविघटन बिंदू काढला जातो ?
१) $\frac{\text{खर्च}}{\text{विक्री}} = \frac{C}{S}$
२) $\frac{\text{एकूण खर्च x विक्री}}{\text{विक्री बदलता खर्च}} = \frac{F \times S}{S - V}$
३) नफा/नफा – मुख्य गुणोत्तर $= \frac{P}{P/V}$
४) $\frac{\text{विक्री बदलता खर्च}}{\text{विक्री}} = \frac{S - V}{S}$

---

५४) पूर्वानुमान करणे म्हणजे –
१) सूचना देणे
२) नोंद करणे
३) श्रमिकांच्या कार्याचे मूल्यमापन करणे
४) भविष्यकालीन अंदाज करणे

---

५५) रु. ८७५ जमेची नोंद रु. ७८५ केली गेली व रु. ६५० दिलेली रक्कम हिशोबात रु. ५६० नोंदविली. या प्रकाराला काय म्हणतात ?
१) फसवणूक
२) अफरातफर
३) भरपाई करणाऱ्या चुका
४) तत्त्वाची चूक

---

५६) मागील अंदाजपत्रक किंवा प्रत्यक्ष कार्य यांचा कशाचाही आधार न घेता तयार केलेले अंदाजपत्रक म्हणजे –
१) भविष्याचा शास्त्रीय अंदाज होय
२) अंदाज होय
३) शून्य आधार अंदाजपत्रक होय
४) उद्दिष्टानुसार व्यवस्थापन होय

---

५७) खालीलपैकी कोणते एक विधान बरोबर आहे ?
१) प्रमाणित परिव्यय लेखांकनाशिवाय अंदाजपत्रकीय नियंत्रण पद्धती कार्य करू शकते
२) प्रमाणित परिव्यय लेखांकनाशिवाय अंदाजपत्रकीय नियंत्रण पद्धती कार्य करू शकत नाही
३) ज्या ज्या ठिकाणी वित्त व खर्च यांचा संबंध येतो, त्या त्या ठिकाणीच अंदाजपत्रकीय नियंत्रण शक्य असते
४) वरीलपैकी एकही नाही

---

५८) चालू संपत्तीच्या विविध घटकात केलेल्या गुंतवणुकीला काय म्हणतात ?
१) निव्वळ खेळते भांडवल
२) स्थूल खेळते भांडवल
३) कायम खेळते भांडवल
४) बदलते खेळते भांडवल

---

५९) खालीलपैकी कोणत्या परिस्थितीत तुम्ही तुमची गुंतवणूक दोन प्रकारच्या प्रतिभूतीत विखरवून धोक्याचे प्रमाण कमी करू शकता ?
१) जेव्हा दोन प्रकारच्या भागात पूर्ण सहसंबंध असतो
२) जेव्हा दोन प्रकारच्या भागात काहीही सहसंबंध नसतो
३) जेव्हा दोन प्रकारच्या भागात सकारात्मक सहसंबंध असतो
४) जेव्हा दोन प्रकारच्या भागात नकारात्मक सहसंबंध असतो

---

६०) खालीलपैकी कोणत्या कारणास्तव सर्व स्तरावरील व्यवस्थापक शून्याधिष्ठित अंदाजपत्रक पद्धत स्वीकारण्यास नाखूष असतात ?
१) या पद्धतीच्या वापरासाठी खूप वेळ व पैसा लागतो
२) प्रस्तावांचे मूल्यमापन करण्यासाठी व प्राधान्य ठरविण्यासाठी, आवश्यक तांत्रिक कौशल्य सर्वच व्यवस्थापकांकडे असू शकत नाही
३) आर्थिकेतर घटकांच्या बाबत खर्च–फायदे विश्लेषण शक्य नसते
४) वरील सर्व

---

६१) 'ब्रेक इव्हन ॲनालिसीस' तंत्र हे अत्यंत उपयुक्त गणले जाते, याचे मुख्य कारण –
१) ग्राहकांना उपयोगी
२) उत्पादित किमतीशी निगडीत स्थिर किमती मोजण्यास उपयुक्त
३) नफ्याच्या प्रमाणात वाढ करण्यासाठी, विक्री किमतीत वाढ करण्यास उपयोगी
४) किंमत–विक्री आणि नफा यांचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी उपयुक्त

---

६२) प्रकल्प चक्राच्या एकात्मता संकल्पना नियोजनांत पुढील पायऱ्या आहेत –
१) प्रकल्प विकास आणि पूर्व अभियांत्रिकी
२) किमती, कंत्राट, घासाघीस, अभियांत्रिकी आराखडा खरेदी/मिळविणे
३) बांधकाम सुरू करणे
४) वरील सर्व

---

६३) धोका विविधता दर्शवतो, धोका दर्शविणारे अनेक मार्ग आहेत. खालीलपैकी महत्त्वाचा मार्ग सांगा.
१) रेंज
२) ॲबसोल्यूट डेव्हिएशन
३) स्टँडर्ड डेव्हिएशन
४) कोइफिशिअंट ऑफ व्हेरिएशन अँड सेमी व्हरायन्स

---

६४) प्रकल्पाची कर्जक्षमता ठरविण्याचा आधार
अ) गुंतवणुकीची उत्पादकता आणि फायदा
ब) लाभार्थींची इच्छा/आकांक्षा
क) प्रकल्पाचे व्यापारपेठेविषयी सर्वेक्षण
ड) उच्च अधिकाऱ्याची शिफारस
१) फक्त 'अ' बरोबर आहे
२) 'अ' आणि 'ब' बरोबर आहे
३) 'अ', 'ब', 'क' बरोबर आहे
४) सर्वच बरोबर आहेत

---

६५) 'पर्टचे' तंत्र हे सर्वप्रथम ...... यांनी विकसित केले.
१) जनरल इलेक्ट्रिकल कंपनी ऑफ अमेरिका
२) अमेरिकन टेलिफोन कंपनी
३) अमेरिकेतील नौदल
४) भारतातील भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड

---

६६) प्रकल्प विश्लेषणातील खालील घटक सामाजिक उद्दिष्टांशी निगडीत आहेत.
१) प्रकल्पांकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन
२) प्रकल्प चालविण्याचा संभाव्य खर्च
३) आवश्यक गोष्टींचा पुरेसा पुरवठा
४) योग्य गुंतवणुकीबाबत प्रकल्पाचा सहभाग

---

६७) प्रकल्प तयार करीत असताना खालील बाबींचा कोणत्या क्रमाने अवलंब करणे आवश्यक आहे ?
१) समस्यांचे विश्लेषण – ध्येयनिश्चिती – अडथळे ओळखणे – आराखडा तयार करण्याचे कौशल्य – प्रकल्प नियोजन
२) उद्दिष्टांचे निश्चितीकरण – आराखडा – समस्यांचे विश्लेषण – अडथळे ओळखणे – प्रकल्प नियोजन
३) आवश्यक कौशल्य आराखडा – ध्येयनिश्चिती – समस्यांचे विश्लेषण – अडथळे ओळखणे – प्रकल्प नियोजन
४) समस्यांचे विश्लेषण – कौशल्य आराखडा – प्रकल्प नियोजन – ध्येय निश्चिती – अडथळे ओळखणे

---

६८) पैशाला वेळेची किंमत असते. प्रकल्पाच्या दृष्टीने एका रुपयाला कालपेक्षा आज अधिक किंमत जाणवते कारण–
१) वैयक्तिक दृष्ट्या उद्यापेक्षा आजच खर्च करणे श्रेयस्कर
२) भांडवल गुंतवणूक ही अधिक चांगल्या उत्पन्नदायी योजनांत करता येते
३) चलनवाढीच्या काळात आजच्या रुपयाची किंमत, एका वर्षापूर्वीच्या खरेदीक्षम किमतीपेक्षा जास्त असणे
४) वरीलपैकी सर्व

---

६९) प्रकल्प खर्च व प्रकल्पाचा कालावधी यांचा घनिष्ठ संबंध आहे. प्रकल्प खर्च वाढेल. जर ......
१) प्रकल्प अनिश्चितपणे चालत राहिला
२) प्रकल्प संपुष्टात आणला
३) प्रकल्प खर्च हा किमान असून पर्याप्त कालावधी आहे
४) वरीलपैकी कोणतेही नाही

---

७०) अ) विधान – गेल्या दशकात महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण वाढलेले आहे.
ब) कारण – महाराष्ट्राच्या वार्षिक नियोजन खर्चात वाढ झाली आहे.
१) अ, ब सत्य आहेत आणि ब हे अ चे अचूक स्पष्टीकरण आहे
२) अ, ब सत्य आहेत पण ब हे अ चे अचूक स्पष्टीकरण नाही
३) अ हे सत्य आहे पण ब हे असत्य आहे
४) अ हे असत्य आहे पण ब हे सत्य आहे

---

७१) मोठ्या शहरात महानगरपालिका स्थापन करतात. या शहरांची लोकसंख्या ...... असते.
१) ५ लाख किंवा त्याहून जास्त २) ७ लाख ३) १० लाख ४) १५ लाख

---

७२) जकात कर बंद करता येणार नाही. कारण –
१) जकात खूप जुना कर आहे २) कराचे आर्थिक महत्त्व
३) जकात चालू राहण्यास व्यापाऱ्यांचा पाठिंबा ४) जकात गोळा करणे सोपे आहे

---

७३) खालीलपैकी कोणत्या एका प्रमुख कारणामुळे बृहन्मुंबई शहर हे देशाची व्यापारी (आर्थिक) राजधानी म्हणून ओळखले जाते ?
१) मुंबईत मोठ्या संख्येने असलेल्या व्यापारी व वित्तीय संस्था
२) विद्यमान व्यापारी व औद्योगिक संस्थांची प्रचंड वार्षिक उलाढाल
३) दुसऱ्या कोणत्याही शहराच्या तुलनेत मुंबई मधून केंद्रीय फंडामध्ये जमा होणारी महसूल व कराची अधिकाधिक रक्कम
४) आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बंदराची सोय असणे

---

७४) बृहन्मुंबईतील झोपडपट्ट्या संबंधीच्या शासनाच्या नवीन धोरणात खालीलपैकी कोणत्या बाबींवर भर दिलेला आहे?
१) झोपडपट्टी सुधारणा
२) झोपडपट्टी श्रेणीवाढ
३) सध्याचेच जागेवर झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्बांधणी करून झोपडपट्टीवासीयांना मोफत घरे देणे
४) स्वावलंबी श्रमदानातून गृहनिर्माण

---

७५) सुमारे १००० यात्रेकरू असलेल्या एका तंबूला आग लागली. बरेच मृत्युमुखी पडले. भविष्यकाळात जीवितहानी होऊ नये म्हणून कोणत्या प्राथमिक योजनांची गरज लागेल ?
१) यात्रेकरूंची पक्क्या घरांत सोय करावी
२) त्वरित पोलीस सहाय्य मिळावे, म्हणून तंबूजवळ दूरध्वनीची व्यवस्था करावी
३) अशा तंबूला खूप दरवाजे ठेवावेत
४) तंबूजवळ पोलीस स्टेशनची व्यवस्था करावी

---

७६) सध्या मुंबईचे नगरपाल कोण आहेत ?
१) नानी पालखीवाला २) सुनिल गावसकर ३) सुनिल दत्त ४) उषा किरण

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

Study CIRCLE

७७) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान ...... येथे आहे.
१) भिवंडी २) बोरिवली ३) बांद्रा ४) बाहुबली

७८) ''बहुतांशी चाळी या सुधारणे अशक्य आहे. फक्त नष्ट करण्यायोग्य आहेत'' असा सल्ला ...... यांनी दिला.
१) शाही श्रम आयोग अहवाल २) जागतिक आरोग्य संघटना
३) आरोग्य मंत्रालय ४) महात्मा गांधी

७९) पहिली जागतिक मराठी परिषद ...... मध्ये झाली.
१) १९३० २) १९६० ३) १९८९ ४) १९४८

८०) १८५२ मध्ये बॉम्बे असोसिएशन ही पहिली राजकीय संघटना कोणी स्थापन केली ?
१) बाळ गंगाधर टिळक २) जगन्नाथ शंकरशेट ३) बाळशास्त्री जांभेकर ४) गोपाळ हरी देशमुख

८१) शहर हे माणसाच्या ...... ची निर्मिती व उगम आहे.
१) निर्वाहाची २) मनोरंजनाची ३) तणावाची ४) सर्जनशील कौशल्याची

८२) १०० क्युबिक सें.मी. शुद्ध पाण्यामध्ये ...... जंतूंचे प्रमाण निश्चित केले आहे.
१) एक कॅलिफॉर्म २) पाच कॅलिफॉर्म ३) आठ कॅलिफॉर्म ४) दहा कॅलिफॉर्म

८३) ...... हे झोपडपट्टीशी संबंधित आहे.
१) अप्रतिष्ठीत जीवन २) उच्च संस्कृती ३) वैज्ञानिक दृष्टिकोन ४) योग्य पर्यावरण

८४) 'नाइट' हा किताब मिळविणारे पहिले भारतीय कोण ?
१) सर जमशेटजी जी. जी. भॉय २) मफतलाल
३) शंकर शेठ ४) सरोजिनी नायडू

८५) शहरे सर्वसाधारणपणे ...... ची निर्मिती करतात.
१) कला २) साहित्य ३) विज्ञान ४) वरील सर्व

८६) मुंबईत पहिली गोदी कोणी बांधली ?
१) लवजी नसरवानजी वाडिया २) शरद जामखानवाला
३) फिरोजशहा मेहता ४) देवेंद्र सक्सेना



study CIRCLE

८७) 'जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्'ची स्थापना कोणी केली ?
१) दादाभाई नौरोजी
२) लॉर्ड एलफिन्स्टन
३) सर जमशेदजी जी. जी. भॉय
४) प्र. के. अत्रे

---

८८) मुंबईत ताजमहाल हॉटेलचे उद्घाटन ...... मध्ये झाले.
१) १८८५
२) १९०९
३) १८९०
४) १९०३

---

८९) ...... हे मुंबईतील पहिले वातानुकूलित सिनेमागृह होय.
१) प्लाझा
२) रिगल
३) मराठा मंदिर
४) राहुल

---

९०) १९९१ च्या जनगणनेप्रमाणे मुंबईमध्ये स्त्री साक्षरतेचे प्रमाण ...... इतके आहे.
१) ६९ टक्के
२) ६५.१४ टक्के
३) ६४.५९ टक्के
४) ५४.०९ टक्के

---

९१) भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे ......
अ) आपल्या शासनावर मुक्तपणे टीका करणे
ब) स्वत:चे विचार मुक्तपणे व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य
क) परकीय शासनावर टीका करणे
ड) कोणावरही अनिर्बंध टीका करण्याचा हक्क
१) फक्त (अ) बरोबर आहे
२) (अ) आणि (ब) बरोबर आहेत
३) (अ), (ब) आणि (क) बरोबर आहेत
४) सर्व विधाने बरोबर आहेत

---

९२) संविधानातील कितव्या विशोधनानुसार संसदेचा हक्क हा मूलभूत हक्क म्हणून गणला गेला आणि तो कायदेशीर हक्क म्हणून समाविष्ट केला गेला ?
१) १७ वे विशोधन
२) २४ वे विशोधन
३) २५ वे विशोधन
४) ४४ वे विशोधन

---

९३) हिंदू विवाह कायद्यातील तरतुदीप्रमाणे खालीलपैकी कोणता नातेसंबंध संबंधित व्यक्तींच्या विवाहास प्रतिबंध करणारा ठरतो ?
अ) भाऊ आणि बहीण
ब) काका आणि पुतणी
क) आत्या आणि भाचा
ड) भावांची आणि बहिणींची मुले–मुली
१) फक्त (अ) बरोबर आहे
२) (अ) आणि (ब) बरोबर आहेत
३) (अ), (ब) आणि (क) बरोबर आहेत
४) सर्व विधाने बरोबर आहेत

---

९४) विधान (अ) – हिंदू स्त्रीच्या ताब्यात असलेली सर्व संपदा तिच्या पूर्ण स्वामित्वाची असते, मर्यादित नव्हे
कारण (र) – कारण हिंदू वारसा कायद्याच्या कलम १४ मध्ये तशी तरतूद आहे
१) (अ) आणि (र) बरोबर असून (र) हे (अ) चे स्पष्टीकरण आहे
२) (अ) आणि (र) बरोबर असून (र) हे (अ) चे स्पष्टीकरण नाही
३) (अ) बरोबर परंतु (र) चूक आहे
४) (अ) चूक परंतु (र) बरोबर आहे

---

९५) 'वक्फ'साठी कोणती उद्दिष्ट्ये अत्यावश्यक आहेत ?
अ) धार्मिक ब) पवित्र वा धर्मादाय क) व्यावसायिक ड) भावनिक
१) फक्त (अ) बरोबर आहे २) (अ) आणि (ब) बरोबर आहेत
३) (अ), (ब) आणि (क) बरोबर आहेत ४) सर्व उत्तरे बरोबर आहेत

---

९६) वर्ज अथवा वर्जनीय करार रद्दबातल करून घेताना त्या करारानुसार मिळालेले लाभ साम्याच्या कोणत्या तत्त्वाप्रमाणे परत केले पाहिजेत ?
१) समानता हेच साम्य होय २) साम्य प्रकाराकडे न पाहता उद्देशाकडे पाहते
३) ज्यास साम्य पाहिजे त्याने साम्य पाळले पाहिजे ४) साम्य कायद्याचा पाठपुरावा करते

---

९७) साम्य व समान कायदा यांच्या संबंधी खालीलपैकी संयुक्तिक असलेले विधान निवडा.
१) समान कायदा साम्यास पूरक असतो २) साम्य समान कायद्यास पूरक असते
३) साम्य समान कायद्याच्या विरोधी असते ४) साम्य स्पष्ट व स्वच्छ समान कायद्यावर मात करते

---

९८) समानतेचा हक्क म्हणजे ......
अ) सर्वांना समानतेने वागविणे
ब) सर्व समानांना समानतेने वागविणे
क) कोणत्याही आधारावर शासनाने नागरिकांमध्ये मतभेद न करणे
ड) नोकऱ्यांमध्ये राखीव जागा
१) (अ) सत्य आहे २) (ब) सत्य आहे ३) (क) सत्य आहे ४) (ड) सत्य आहे

---

९९) संविधानातील खालीलपैकी कोणते कलम अस्पृश्यता निवारणासंबंधी आहे ?
अ) कलम १४ ब) कलम १७ क) कलम १८ ड) कलम १९
१) (अ) बरोबर आहे २) (ब) बरोबर आहे ३) (क) बरोबर आहे ४) सर्व उत्तरे बरोबर आहेत

---

१००) मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासंबंधीचा रिट दाखल करण्याचा हक्क कोणत्या कलमांनुसार उपलब्ध होतो ?
१) कलम १७ २) कलम ३० ३) कलम ३२ ४) कलम ३३

---

□□□

## Answers

१) ...... या शहराची महानगरपालिका भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीपूर्वी स्थापन करण्यात आली.
 १) नागपूर  २) कोलकाता  ३) बंगलोर  ४) कानपूर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १–२ | २–२ | ३–२ | ४–१ | ५–३ | ६–१ | ७–४ | ८–२ | ९–४ | १०–४ |
| ११–३ | १२–३ | १३–३ | १४–३ | १५–१ | १६–२ | १७–१ | १८–१ | १९–२ | २०–२ |
| २१–४ | २२–२ | २३–२ | २४–३ | २५–२ | २६–२ | २७–१ | २८–२ | २९–४ | ३०–२ |
| ३१–४ | ३२–२ | ३३–४ | ३४–३ | ३५–१ | ३६–४ | ३७–४ | ३८–१ | ३९–४ | ४०–२ |
| ४१–३ | ४२–२ | ४३–४ | ४४–४ | ४५–२ | ४६–४ | ४७–४ | ४८–४ | ४९–२ | ५०–४ |
| ५१–३ | ५२–३ | ५३–२ | ५४–४ | ५५–३ | ५६–३ | ५७–२ | ५८–२ | ५९–२ | ६०–४ |
| ६१–४ | ६२–४ | ६३–३ | ६४–३ | ६५–३ | ६६–१ | ६७–१ | ६८–४ | ६९–१ | ७०–१ |
| ७१–१ | ७२–२ | ७३–३ | ७४–३ | ७५–३ | ७६–x | ७७–२ | ७८–३ | ७९–३ | ८०–२ |
| ८१–१ | ८२–१ | ८३–१ | ८४–१ | ८५–४ | ८६–१ | ८७–३ | ८८–४ | ८९–३ | ९०–३ |
| ९१–२ | ९२–४ | ९३–३ | ९४–१ | ९५–२ | ९६–३ | ९७–२ | ९८–३ | ९९–२ | १००–३ |

Study CIRCLE